## –: नि.दि.दावा क्र.३५/२०२६ मधील नि.क्र.०५ वरील आदेश :–

*(पारित दि.१०/०३/२०२६)*

**०१.** प्रस्तुत अर्ज वादींनी प्रतिवादी क्र.१ ते २ यांचेविरूद्ध मौजे अमरापूर, ता.कडेगांव, जि.सांगली येथील जमीन मिळकत गट क्र.८२२ **(संक्षेपासाठी यापुढे ज्यास 'दावा मिळकत १अ' असे संबोधले आहे),** जमीन मिळकत गट क्र.८१९ **(संक्षेपासाठी यापुढे ज्यास 'दावा मिळकत १ब' असे संबोधले आहे),** जमीन मिळकत गट क्र.८३१ **(संक्षेपासाठी यापुढे ज्यास 'दावा मिळकत १क' असे संबोधले आहे),** जमीन मिळकत गट क्र.८३२ **(संक्षेपासाठी यापुढे ज्यास 'दावा मिळकत १ड' असे संबोधले आहे),** या मिळकतींबाबत तुर्तातुर्त ताकीद मिळण्यासाठी दाखल केला असून वादींचे कथन आहे की, दावा मिळकत १अ ही जमीन मिळकत वादी व प्रतिवादी क्र.३ ते ५ यांचे वडीलार्जित मालकी हक्क वहिवाटीची होती व आहे, वादी क्र.१ व २ तसेच प्रतिवादी क्र.३ व ४ हे सख्खे भाऊ असून प्रतिवादी क्र.५ ही त्यांची आई आहे, दावा मिळकत १अ मधील गट क्र.८२२ मध्ये वादी क्र.१,२ व प्रतिवादी क्र.३ ते ५ यांचे एकत्र कुटुंबातील ०० हे. १० आर. व पो.ख.०० हे. ०१ आर. असे एकूण ०० हे. ११ आर. क्षेत्र समाईकातील मालकी वहिवाटीचे असून त्यामध्ये वादींचे ऊसाचे खोडवा पिक आहे, तसेच या मिळकतीचे पश्चिम व उत्तर बाजूस प्रतिवादी क्र.१ ची जमीन गट क्र.८१९ चे मालकी वहिवाटीचे ०० हे. ३७ आर. व पो.ख.०.०२ असे एकूण ०० हे. ३९ आर. क्षेत्र आहे, दावा जमीन मिळकत गट क्र.८२२ मध्ये प्रतिवादी क्र.१ चा काहीएक हक्कसंबंध नव्हता व नाही, सदरच्या वादींच्या गटामधील फाळणी नकाशाचे मुळ सर्व्हे नंबरचे हद्दीनुसार वहिवाटी होत्या व आजतागायत अस्तित्वात आहेत, दावा मिळकत १ब मधील प्रतिवादी क्र.१ दिलीप संपतराव देशमुख यांची जमीन मिळकत गट क्र.८१९ ही वादीचे गट क्र.८२२ चे पश्चिम व उत्तर बाजूस लागून ०० हे. ३९ आर. क्षेत्राचा पो.ख.सह हिस्सा आहे, गट क्र.८१९ मधील दक्षिण बाजूस म्हणजेच वादींचे उत्तर बाजूस वादींचे क्षेत्रात प्रतिवादी क्र.१ चा काहीही हक्कसंबंध नव्हता व नाही, प्रतिवादी क्र.१ ने दि.२१/०३/२०२४ रोजी गट क्र.८१९ ची मोजणी करुन घेतली आहे व त्या मोजणी अन्वये 'प्रतिवादी क्र.१ चे गट क्र.८१९ चे दक्षिण बाजूस गट क्र.८२२ चे धारकांनी ०० हे. ०३ आर. क्षेत्रात अतिक्रमण केले आहे, ते दूर होवून अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळावा' असा तहसिलदार कडेगांव यांचेकडे अर्ज केला आहे व त्यावरुन तहसिलदार यांचेसमोर क्र.बि.एन.डी./एस.आर/०२/२०२४ ची केस चालून तहसिलदार कडेगांव यांनी '० हे. ०३ आर. अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा प्रतिवादी क्र.१ यांस देववावा' असा चुकीचा व बेकायदेशीर आदेश दि.३०/०९/२०२५ रोजी दिला.

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.03.10 18:32:49 +0530

**०२.** वादींनी पुढे कथन केले की, तथाकथित मोजणी करतेवेळी मोजणीदार यांनी गट क्र.८१९ व ८२२ ची एकत्रीत मोजणी (Joint measurement) केलेली नाही, मोजणीदार यांनी दोन्ही गटांची एकत्रीत मोजणी केली नाही असे दिसते, मोजणीदार यांचा तथाकथीत मोजणी नकाशा चुकीचा व बेकायदेशीर असून सदरची मोजणी करीत असताना मुळ हद्दीचे दगड, मुळ फाळणी नकाशातील खुणा न पाहता मोजणीदार यांनी तथाकथित मोजणी नकाशा व चुकीच्या नवीन हद्दीच्या खुणा दाखवून दाखल केलेला मोजणी नकाशा हा चुकीचा व बेकायदेशीर असून सदर बेकायदेशीर मोजणी नकाशावर विश्वास ठेवून व वादी, प्रतिवादी यांचे जबाब न घेता मा.तहसिलदार कडेगांव यांनी क्र.बि.एन.डी./एस.आर/०२/२०२४ चे कामी दि.३०/०९/२०२५ रोजी दिलेला निर्णय बेकायदेशीर असून सदर आदेश सेट असाईड होवून मिळणेकरिता तसेच दावा जमीन गट क्र.८२२ ही वादी व प्रतिवादी क्र.३ ते ५ यांचे मालकी वहिवाटीची आहे असे जाहीर होवून मिळणेकरीता वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र.१ चे विरुद्ध दाखल केलेला आहे, त्याचप्रमाणे दावा मिळकत १क मधील जमीन गट क्र.८३१ ही वादी व प्रतिवादी क्र.३ ते ५ यांचे वडीलार्जित समाईक मालकी हक्क वहिवाटीची असून दावा मिळकत १क मधील वादींचे गट क्र.८३१ चे उत्तर बाजूस प्रतिवादी क्र.२ चे मालकी हक्क वहिवाटीचे गट क्र.८३२ मध्ये ०० हे ३२ आर. पो.ख.सह क्षेत्र आहे, गट क्र.८३१ मध्ये वादी व प्रतिवादी क्र.३ ते ५ यांची समाईकामध्ये वहिवाट असून त्यामध्ये खोडवा ऊसाचे पिक आहे, दावा जमीन गट क्र.८३१ मध्ये प्रतिवादी क्र.२ चा काहीही हक्कसंबंध नव्हता व नाही,

**०३.** वादींनी पुढे कथन केले की, प्रतिवादी क्र.२ ने दि.१८/०३/२०२४ रोजी गट क्र.८३२ ची मोजणी करुन घेतली आहे व त्या मोजणी अन्वये 'जमीन गट क्र.८३१ चे धारकांनी प्रतिवादींचे गट क्र.८३२ चे दक्षिण बाजूस ० हे. ०२ आर क्षेत्रात अतिक्रमण केले आहे ते दूर होवून अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळावा' असा तहसिलदार कडेगांव यांचेकडे अर्ज केला त्यावरुन तहसिलदारसाो. यांचेसमोर क्र.बि.एन.डी./एस.आर/०२/२०२४ ची केस चालून तहसिलदारसाो. यांनी 'वादी व प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी ० हे. ०२ आर. अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा प्रतिवादी क्र.२ यांस देववावा', असा चुकीचा व बेकायदेशीर आदेश दि.३०/०९/२०२५ रोजी दिला व त्याची समज वादींना दि.२९/१०/२०२५ रोजी मिळाली, तथाकथित मोजणीदार यांनी गट क्र.८३२ व गट क्र.८३१ ची एकत्रीत मोजणी (Joint measurement) केलेली नाही, मोजणीदार यांनी दोन्ही गटांची एकत्रीत मोजणी केली नाही असे दिसते, सदर तहसिलदार यांचेसमोर चाललेल्या केसमध्ये यातील वादींनी योग्य ती वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणेकरिता (Joint measurement) ची मागणी अर्जाने केली

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.03.10 18:32:54 +0530

असता ती मागणी देखील मे.तहसिलदारसाो. यांनी फेटाळून लावली, तसेच मोजणीदार यांचा तथाकथित मोजणी नकाशा चुकीचा व बेकायदेशीर असताना सदर मोजणी नकाशावर विश्वास ठेवून मा.तहसिलदारसाो. कडेगांव यांनी क्र.बि.एन.डी./एस.आर/०२/२०२४ चे कामी दि.३०/०९/२०२५ रोजी दिलेला निर्णय वादी व प्रतिवादी क्र.३ ते ५ यांचे गट क्र.८३१ चे बाबतीत दिलेला निर्णय बेकायदेशीर असून सदर आदेश सेट असाईड होवून मिळणेकरिता तसेच दावा जमीन मिळकत गट क्र.८३१ ही वादी व प्रतिवादी क्र.३ ते ५ यांचे मालकी वहिवाटीची आहे, असे जाहीर होवून मिळणेकरिता प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

**०४.** वादींनी पुढे कथन केले की, अशी वस्तुस्थिती असताना प्रतिवादी क्र.१ चा दावा मिळकत १अ मिळकतीमध्ये हक्कसंबंध नसताना व प्रतिवादी क्र.२ चा दावा मिळकत १क मिळकतीमध्ये हक्कसंबंध नसताना प्रतिवादी क्र.१ ते २ हे अनाधिकाराने व बेकायदेशीरपणे तहसिलदारसाो. कडेगांव यांचे बेकायदेशीर व रद्दबातल आदेशाचा दुरुपयोग करुन प्रतिवादी क्र.१ हा दावा मिळकत १अ मधील जमीन गट क्र.८२२ मध्ये उत्तर बाजूस अनाधिकाराने व जबरदस्तीने वरील मिळकतीचा कब्जा घेवून वादींचे नुकसान करणेचे विचारात आहे, तसेच दावा मिळकत १क मध्ये जमीन मिळकत गट क्र.८३१ मधील मिळकतीचा कब्जा घेणारच अशी अरेरावीची भाषा प्रतिवादी क्र.२ हा गावामध्ये बोलू लागला आहे, तसेच वादींचे मिळकतीत प्रतिवादी क्र.१ ते २ हे जबरदस्तीने कब्जा घेण्याचे विचारात आहेत, असे नुकतेच त्यांनी दि.१०/०१/२०२६ रोजी बोलून दाखविले, त्याचप्रमाणे आम्ही मे.तहसिलदारसाो. कडेगांव यांचेकडून सदर मिळकतीचा कायदेशीर ताबा घेणार आहोत, असे बोलून दाखविलेमुळे व प्रतिवादी क्र.१ ते २ यांचे पाठीशी राजकीय बळ आहे, त्याचा उपयोग करुन दावा मिळकत १अ व १क मध्ये अनुक्रमे प्रतिवादी क्र.१ ते २ हे मिळकतीचा कब्जा घेतलेशिवाय गप्प बसणार नाहीत, तसे घडलेस वादींचे कायमस्वरुपी पैशात न भरुन येणारे नुकसान होवून वादींना त्यांचे नाहक हक्कास मुकावे लागणार असून वादींचे हक्कावर गदा येणार आहे, म्हणून प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी स्वत: एजंट, नोकर यांचेमार्फत वादींचे दावा जमीन गट क्र.८२२ व ८३१ मध्ये शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी हरकत व अडथळा करु नये, अशी प्रतिवादी क्र.१ ते २ विरुद्ध निरंतर ताकीद देणेकरिता व दावा मिळकत १अ मधील जमीन मिळकत गट क्र.८२२ व दावा मिळकत १क मधील जमीन मिळकत गट क्र.८३१ या दोन्ही मिळकती वादींचे मालकी हक्क वहिवाटीच्या होत्या हे जाहीर होवून मिळावे यासाठी वादींनी प्रतिवादी क्र.१ ते २ यांचेविरुद्ध सदरचा दावा दाखल केला आहे.

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.03.10 18:33:02 +0530

**०५.** वादींनी पुढे कथन केले की, प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी दि.२१/०३/२०२४ रोजी गट क्र.८१९ ची मोजणी करुन घेतली आहे, त्यामध्ये गट क्र.८२२ चे धारकांनी ० हे. ०३ आर क्षेत्रात अतिक्रमण केले आहे, ते दूर होवून अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळावा, असा तहसिलदारसाो. कडेगांव यांचेकडे अर्ज केला, त्यावरुन तहसिलदारसाो. कडेगांव यांचेसमोर बी.एन.डी./एस.आर/ ०२/२०२४ ची केस चालून तहसिलदारसाो. यांनी ०हे.०३ आर. अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा प्रतिवादी क्र.१ ला देववावा असा आदेश दिला, त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.२ ने दि.२१/०३/२०२४ रोजी गट क्र.८३२ ची मोजणी करुन घेतली आहे व त्यामध्ये गट क्र.८३१ चे धारकांनी ० हे. ०२ आर. क्षेत्रात अतिक्रमण केले आहे, ते दूर होवून अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळावा, असा तहसिलदारसाो. कडेगांव, ता.कडेगांव यांचेकडे अर्ज केला, त्यावरुन तहसिलदारसाो. कडेगांव यांचेसमोर बि.एन.डी./एस.आर /०२/२०२४ ची केस चालून तहसिलदारसाो. यांनी 'प्रतिवादी क्र.२ ला ० हे. ०२ आर. अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा वादी यांनी देववावा' असे दोन्ही गट नंबरचे बाबतीत चुकीचे व बेकायदेशीर आदेश दि.३०/०९/२०२५ रोजी दिले, वरीलप्रमाणे तथाकथीत मोजणीचे वेळी वादींचे कोणतेही म्हणणे मोजणीदार यांनी ऐकून घेतले नाही, त्याचप्रमाणे तथाकथीत मोजणीदार यांनी गट क्र.८१९ व गट क्र.८२२ ची एकत्रीत मोजणी (Joint measurement) केलेली नाही, तसेच वादींचे गट क्र.८३१ व प्रतिवादी क्र.२ यांचे गट क्र.८३२ ची देखील एकत्रीत मोजणी केलेली नाही, मोजणीदार यांचा दोन्ही मोजणीमधील तथाकथीत मोजणी नकाशा चुकीचा व बेकायदेशीर आहे, सदर बेकायदेशीर मोजणी नकाशावर विश्वास ठेवून मा.तहसिलदारसाो. कडेगांव यांनी तथाकथीत बी.एन.डी./एस.आर/०२/२०२४ चे कामी दि.३०/०९/२०२५ रोजी दिलेला निर्णय बेकायदेशीर असून सदर आदेश सेट असाईड होवून मिळणेबाबत तसेच वादींची दावा जमीन गट क्र.८२२ व गट क्र.८३१ ही वादी व प्रतिवादी क्र.३ ते ५ यांची मालकी वहिवाटीची आहे, असे जाहीर होवून मिळणेकरिता प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

**०६.** वादींनी पुढे कथन केले की, बी.एन.डी./एस.आर/०२/२०२४ च्या निकालाच्या आधारे प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी दांडगाव्याने वादींना दावा मिळकतीमधून हुसकावून कब्जा केलेस वादींचे अपरिमीत असे नुकसान होईल, सबब या दाव्याचे अंतिम निकालापर्यंत बी.एन.डी./एस.आर/०२/२०२४ चे मे.तहसिलदारसाो. कडेगांव यांनी दि.३०/०९/२०२५ रोजी दिलेल्या निकालास स्थगिती देणेत यावी व प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी दावा मिळकतीतील वादी व प्रतिवादी क्र.३ ते ५ यांचे समाईकातील कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा करु नये, अशी दरम्यानची तुर्तातुर्त ताकीद देण्यात

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.03.10 18:33:07 +0530

यावी, अशी ताकीद दिलेस प्रतिवादी क्र.१ ते २ यांचे काहीही नुकसान होणार नाही, परंतु अशी ताकीद दिली नाही तर वादींचे अपरिमीत असे कधीही पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार आहे, बॅलन्स ऑफ कन्वीनिअंस व ग्रेटर हार्डशिप हे न्यायाची तत्वे वादींच्या बाजूची आहेत, त्यामुळे, 'प्रस्तुत दाव्याचे अंतिम निकालापर्यंत बी.एन.डी./एस.आर/०२/२०२४ चे कामी मे.तहसिलदारसाो. कडेगांव यांनी दि.३०/०९/२०२५ रोजी दिलेल्या निकालास स्थगिती देणेत यावी व बी.एन.डी./एस.आर/०२/२०२४ च्या निकालाच्या आधारे प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी दावा मिळकतीमधील वादींचे कब्जेवहिवाटीस हरकत अथवा अडथळा करु नये,' अशी प्रतिवादी क्र.१ ते २ यांना तुर्तातुर्त ताकीद देणेसाठी वादींनी विनंती केली आहे.

**०७.** प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी नि.क्र.१६ येथे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले असून प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी वादींचे अर्जातील कथने नाकारली आहेत. प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी कथन केले आहे की, वादींचा अर्ज खोटा व लबाडीचा असून प्रतिवादी क्र.१ ते २ यांना मान्य व कबुल नाही, वादींनी फेरीस्तसोबत दाखल केलेले सर्व कागदपत्रे प्रतिवादींचे हिताविरोधी आहेत अशी कागदपत्रे प्रतिवादींना मान्य व कबुल नाहीत व अशी कागदपत्रे पुराव्याचे कामी वाचणेस येवू नयेत, वस्तुस्थिती अशी आहे की, दावा मिळकत १अ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीपैकी दावा मिळकत १अ व १क या मिळकती वादी, प्रतिवादी क्र.३ ते ५ यांच्या वडीलार्जित मालकी हक्क वहिवाटीच्या आहेत व दावा मिळकत १ब ही मिळकत यातील प्रतिवादी क्र.१ ची असून दावा मिळकत १ड ही मिळकत प्रतिवादी क्र.२ ची असून या प्रतिवादींच्या वडीलार्जित आपआपसातील वाटपाप्रमाणे प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीस असलेल्या मिळकती होत्या व आहेत, अशा परिस्थीतीत अलिकडे टेंभू व ताकारी योजनेचे पाणी आले असलेने सर्व क्षेत्र बागायत झालेने वादी क्र.१ ते २ व प्रतिवादी क्र.३ ते ५ हे प्रतिवादी क्र.१ ते २ यांच्या दावा मिळकत १ब व १ड या मिळकतींचे हद्दीवरुन सातत्याने वाद निर्माण करत असलेने प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी यापुर्वी दोन वेळा मोजणीसाठी अर्ज दिला होता, परंतु सदरची मोजणी वादी यांनी होवू दिली नाही.

**०८.** प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी पुढे कथन केले की, दावा मिळकत १ब मध्ये नमुद केलेली मिळकत गट क्र.८१९ ही प्रतिवादी क्र.१ ची वडीलार्जित मिळकत असून दावा मिळकत १ब या मिळकतीचे उत्तर पूर्व कोपऱ्यातील प्रतिवादी क्र.१ चे हिश्याच्या लगत दक्षिणेस वादी, प्रतिवादी क्र.३ ते ५ यांची गट क्र.८२२ ची मिळकत असून गट क्र.८१९ च्या दक्षिणेकडील व गट क्र.८२२ चे उत्तरेकडील पुर्व पश्चिम हद्दीवरुन वाद उपस्थित झालेने प्रतिवादी क्र.१ ने त्यांचे गट क्र.८१९ ची भुमीअभिलेख कडेगांव यांचेकडे नियमीत मोजणी होवून हद्दी कायम करणेबाबत मोजणीचा अर्ज दाखल केला,

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.03.10 18:33:11 +0530

त्यानुसार दि.२१/०३/२०२४ रोजी दावा मिळकत १ब मिळकतीची मो.र.नं.४२१८/२०२४ ने मोजणी होवून दावा मिळकत १ब मिळकतीच्या हद्दी दि.२१/०५/२०२४ रोजी कायम केलेल्या आहेत, दावा मिळकत १ब गट क्र.८१९ चा मुळ स.नं.९१ असून सदरची मोजणी ही ९(३)९(४) चा उतारा, सर्व्हे नंबरचा टिपण उतारा, सर्व्हे नं.९१ चा फाळणी नकाशा व गट नकाशाच्या आधारे केली असलेमुळे लगतच्या गटांचीही त्यावेळी मोजणी करुन क्षेत्र वेगळे करुन प्रतिवादी क्र.१ च्या गटाचा वेगळा नकाशा तयार केलेला होता, दावा मिळकत १ब मिळकतीची झाले मोजणीप्रमाणे मोजणी नकाशा सुद्धा तयार झाला असून सदर मोजणी नकाशात वादी, प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी दावा मिळकत गट क्र.८१९ मध्ये दक्षिण बाजूने पूर्व पश्चिम चालीने ०३ आर क्षेत्रात अतिक्रमण केलेचे स्पष्टपणे दर्शविलेले आहे, सदर मोजणी नकाशाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ हे वादी, प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी त्यांनी केलेले अतिक्रमण काढून घेणेची विनंती दावा मिळकतीच्या हद्दी कायम केलेपासून तहसिलदार यांचेकडे अर्ज करेपर्यंत वारंवार करीत आलेले होते, तरीसुद्धा वादी, प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी प्रतिवादी क्र.१ चे गट क्र.८१९ मध्ये केलेले अनाधिकाराचे अतिक्रमण काढून घेतले नाही, त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी मा.तहसिलदार कडेगाव यांचेकडे अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळणेकरीता बी.एन.डी.अर्ज नं.०२/२०२४ चा अर्ज दाखल केलेला होता, सदर अर्जाची दुतर्फा चौकशी होवून मोजणीदाराचा जबाब देखील झालेला होता, त्याप्रमाणे अतिक्रमण केलेले शाबीत झालेले होते.

**०९.** प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी पुढे कथन केले की, दावा मिळकत १ड मध्ये नमूद केलेली मिळकत गट क्र.८३२ ही प्रतिवादी क्र.२ ची वडीलार्जित मिळकत असून दावा मिळकत १ड या मिळकतीचे उत्तर पुर्व कोपऱ्यातील प्रतिवादी क्र.२ चे हिश्याच्या लगत दक्षिणेस वादी, प्रतिवादी क्र.३ ते ५ यांची गट क्र.८३२ ची मिळकत असून गट क्र.८३२ च्या दक्षिणेकडील व गट क्र.८३१ चे उत्तरेकडील पुर्व पश्चिम हद्दीवरुन वाद उपस्थित झालेने प्रतिवादी क्र.२ ने त्यांचे गट क्र.८३२ ची भुमीअभिलेख कडेगांव यांचेकडे नियमीत मोजणी होवून हद्दी कायम करणेबाबत मोजणीचा अर्ज दाखल केला, त्यानुसार दि.१८/०३/२०२४ रोजी दावा मिळकत १ड या मिळकतीची मो.र.नं.४१६२/२०२३ ने मोजणी होवून दावा मिळकत १ड मिळकतीच्या हद्दी दि.२६/०४/२०२४ रोजी कायम केलेल्या आहेत, दावा मिळकत १ड गट क्र.८३२ चा मुळ स.नं.१०७ असून सदरची मोजणी ही ९(३)९(४) चा उतारा, सर्व्हे नंबरचा टिपण उतारा, सर्व्हे नं.१०७ चा फाळणी नकाशा व गट नकाशाच्या आधारे केली असलेमुळे लगतच्या गटांचाही त्यावेळी मोजणी करुन क्षेत्र वेगळे करुन प्रतिवादी क्र.२ च्या गटाचा वेगळा नकाशा तयार केलेला होता, दावा मिळकत १ड गट क्र.८३२ या

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.03.10 18:33:17 +0530

मिळकतीची झाले मोजणीप्रमाणे नकाशासुद्धा तयार झाला असून सदर मोजणी नकाशात वादी, प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी दावा मिळकत गट क्र.८३२ मध्ये दक्षिण बाजूने पुर्व पश्चिम चालीने ०२ आर. क्षेत्रात अतिक्रमण केलेचे स्पष्टपणे दर्शविलेले आहे, सदर मोजणी नकाशाप्रमाणे प्रतिवादी क्र.२ हे वादी, प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी त्यांनी केलेले अतिक्रमण काढून घेणेची विनंती दावा मिळकत १ड मिळकतीच्या हद्दी कायम केलेपासून तहसिलदार यांचेकडे अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळणेकरीता अर्ज दाखल करेपर्यंत वारंवार करीत आलेले आहेत, तरीसुद्धा वादी, प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी प्रतिवादी क्र.२ चे गट क्र.८३२ मध्ये केलेले अनाधिकाराचे अतिक्रमण काढून घेतलेले नाही, त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी मा.तहसिलदार कडेगांव यांचेकडे अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळणेकरीता बी.एन.डी.अर्ज नं.०२/२०२४ चा अर्ज दाखल केलेला होता, सदर अर्जाची दुतर्फा चौकशी होवून मोजणीदाराचा जबाब देखील झालेला होता, त्याप्रमाणे अतिक्रमण शाबीत झालेले आहे, त्यानुसार तहसिलदार यांनी बी.एन.डी.अर्ज नं.०२/२०२४ चे कामी अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा प्रतिवादी क्र.१ ते २ यांना देणेबाबत दि.३०/०९/२०२५ रोजी आदेश केलेला आहे, तो योग्य व बरोबर असून त्यानुसार प्रतिवादी क्र.१ ते २ यांना दावा मिळकत १ब व १ड या मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी केलेले अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा द्यावा लागू नये म्हणून वादी यांनी सदरचा खोटा व लबाडीचा दावा दाखल केलेला आहे, त्याचप्रमाणे वादींनी आजअखेर त्यांचे गटाची मोजणी करुन घेतलेली नसल्यामुळे वादीचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज खर्चासह फेटाळणेत यावा.

**१०.** प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी पुढे कथन केले की, वादींना केस प्रायमाफेसी नाही, बॅलन्स ऑफ कन्वीनिअंस, ग्रेटर हार्डशीप ही न्यायाची तत्वे प्रतिवादी क्र.१ ते २ यांच्या बाजूने आहेत, तहसिलदार यांनी दिलेला निर्णय योग्य व कायेदशीर असलेने सदर निर्णयाची अंमलबजावणी झालेस वादी, प्रतिवादी क्र.३ ते ५ यांचे कोणतेही नुकसान होत नाही, सबब वादींचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज चालणेस पात्र नाही, तहसिलदार यांचे आदेशाचे अंमलबजावणीस न्यायालयाने स्थगिती दिलेस प्रतिवादी क्र.१ ते २ यांचे मालकीचे क्षेत्र नाहक वादी, प्रतिवादी क्र.३ ते ५ यांचे ताब्यात राहून प्रतिवादींचे रास्त हक्कावर गदा येवून त्यांचे पैशाने न भरुन येणारे असे अपरिमीत नुकसान होणार आहे, याउलट वादींचे काहीही नुकसान होणार नाही, त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी प्रस्तुत तुर्तातुर्त ताकीदीसाठीचा अर्ज खर्चासह रद्द करण्याची विनंती केली आहे.

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.03.10 18:33:21 +0530

**११.** वादींनी आपल्या कथनांच्या पुष्ट्यर्थ खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा दिलेला आहे.

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १. | ३/१ | मा.तहसिलदार, कडेगांव यांचेसमोरील क्र.बी.एन.डी./एस.आर/०२/२०२४ मधील निकालपत्राची नक्कल |
| २. | ३/२ | मौजे अमरापूर येथील गट क्र.८२२ चा सन २०१९-२० ते २०२१-२२ चे ७/१२ उताऱ्याची डिजीटल प्रत |
| ३. | ३/३ | मौजे अमरापूर येथील गट क्र.८३१ चा सन २०२५-२६ चे ७/१२ उताऱ्याची डिजीटल प्रत |
| ४. | ३/४ | मौजे अमरापूर येथील गट क्र.८१९ चा सन २०२५-२६ चे ७/१२ उताऱ्याची डिजीटल प्रत |
| ५. | ३/५ | मौजे अमरापूर येथील गट क्र.८३२ चा सन २०२५-२६ चे ७/१२ उताऱ्याची डिजीटल प्रत |
| ६. | २०/१ | मौजे अमरापूर येथील सर्व्हे क्र.९१ चे फाळणीचा नकाशा |
| ७. | २०/२ | मौजे अमरापूर येथील गट क्र.८३१ चा नकाशा |
| ८. | २०/३ | मौजे अमरापूर येथील गट क्र.८२२ चा नकाशा |
| ९. | २०/४ | मंडल अधिकारी कडेगांव यांची दि.१६/०२/२०२६ रोजीची बी.एन.डी.केस नं.०२/२०२४ चा कब्जा देणेबाबतची नोटीस |
| १०. | २०/५ | मौजे अमरापूर येथील सर्व्हे क्र.९१/६ चा ९(३)९(४) चा उतारा |
| ११. | २०/६ | मौजे अमरापूर येथील सर्व्हे क्र.१०७/६अ चा ९(३)९(४) चा उतारा |
| १२. | २६/१ | मौजे अमरापूर येथील सर्व्हे क्र.१०७ चा फाळणी नकाशा |

**१२.** प्रतिवादी क्र.१ ते २ यांचेतर्फे आपल्या कथनांच्या पुष्ट्यर्थ खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा दिलेला आहे.

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १. | १८/१ | मौजे अमरापूर येथील गट क्र.८१९ चा मो.र.नं.४२१२ चा मोजणी नकाशा |
| २. | १८/२ | मौजे अमरापूर येथील गट क्र.८३२ चा मो.र.नं.४१६२ चा मोजणी नकाशा |

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.03.10 18:33:27 +0530

| | | |
|---|---|---|
| ३. | १८/३ | मौजे अमरापूर येथील गट क्र.८१९ बाबत तहसिलदार यांचेकडील मोजणीदार सिद्धार्थ कुदळे यांच्या जबाबाची नक्कल |
| ४. | १८/४ | मौजे अमरापूर येथील गट क्र.८३२ बाबत तहसिलदार यांचेकडील मोजणीदार सतिश काटे यांच्या जबाबाची नक्कल |
| ५. | २२/१ | मौजे अमरापूर येथील खाते क्र.४४४, गट क्र.८१९ व ८३२ चा ९(३)९(४) चा उतारा |
| ६. | २२/२ | मौजे अमरापूर येथील खाते क्र.५५, गट क्र.८३१ व ८२२ चा ९(३)९(४) चा उतारा |

**१३.** वादी व प्रतिवादी क्र.१ ते २ यांच्यातर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत खटल्यात दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केल्यानंतर खालील वादबिंदू माझ्या विचारार्थ येत असून त्यावरील माझे निष्कर्ष कारणासहीत खाली नोंदविले आहेत–

| **अ.क्र** | **वादबिंदू** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादींनी सकृतदर्शनी केस वादींच्या बाजुने असल्याचे शाबीत केले आहे का ? | होय. |
| २. | न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने आहे, असे वादींनी शाबीत केले आहे का ? | होय. |
| ३. | तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजुर झाल्यास वादींचे कशानेही न भरुन येणारे असे नुकसान होईल असे वादींनी शाबीत केले आहे का ? | होय. |
| ४. | काय आदेश ? | नि.क्र.०५ चा अर्ज मंजूर करण्यात येतो. |

# कारणमीमांसा

**१४.** प्रस्तुत खटल्यातील अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दावा मिळकत १अ व १क या मिळकती वादी, प्रतिवादी क्र.३ ते ५ यांच्या वडीलार्जित मालकी हक्क वहिवाटीच्या आहेत व दावा मिळकत १ब ही मिळकत यातील प्रतिवादी क्र.१ ची असून दावा मिळकत १ड ही मिळकत प्रतिवादी क्र.२ ची आहे, तसेच, प्रतिवादी क्र.१ च्या अर्जावरुन झालेल्या दावा मिळकत १ब गट क्र.८१९ च्या मो.र.नं.४२१८/२०२४ च्या मोजणीप्रमाणे मोजणी नकाशा तयार झाला असून सदर मोजणी नकाशात वादी, प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी दावा मिळकत गट क्र.८१९ मध्ये

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.03.10 18:33:33 +0530

दक्षिण बाजूने पूर्व पश्चिम चालीने ०३ आर क्षेत्रात अतिक्रमण केलेचे दर्शविलेले असून प्रतिवादी क्र.२ च्या अर्जावरुन झालेल्या दावा मिळकत १ड गट क्र.८३२ च्या मो.र.नं.४१६२/२०२३ च्या मोजणीप्रमाणे मोजणी नकाशा तयार झाला असून सदर मोजणी नकाशात वादी, प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी दावा मिळकत गट क्र.८३२ मध्ये दक्षिण बाजूने पुर्व पश्चिम चालीने ०२ आर. क्षेत्रात अतिक्रमण केलेचे दर्शविलेले आहे, त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी तहसिलदार कडेगांव यांचेकडे दाखल केलेल्या बी.एन.डी./एस.आर/०२/२०२४ चे कामी मे.तहसिलदारसाो. कडेगांव यांनी दि.३०/०९/२०२५ रोजी 'प्रतिवादी क्र.१ ला ०हे.०३ आर. अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा वादी यांनी द्यावा व प्रतिवादी क्र.२ ला ० हे. ०२ आर. अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा वादी यांनी द्यावा', असा आदेश दिलेला आहे या बाबी दोन्ही पक्षांना मान्य आहेत.

**१५.** वादींचे कथन आहे की, दावा मिळकत १ब गट क्र.८१९ ची मो.र.नं.४२१८/२०२४ मोजणी व दावा मिळकत १ड गट क्र.८३२ ची मो.र.नं.४१६२/२०२३ मोजणी करत असताना वादींचे कोणतेही म्हणणे मोजणीदार यांनी ऐकून घेतले नाही, त्याचप्रमाणे तथाकथीत मोजणीदार यांनी गट क्र.८१९ व गट क्र.८२२ ची एकत्रीत मोजणी (Joint measurement) केलेली नाही, तसेच वादींचे गट क्र.८३१ व प्रतिवादी क्र.२ यांचे गट क्र.८३२ ची देखील एकत्रीत मोजणी केलेली नाही, मोजणीदार यांचा दोन्ही मोजणीमधील तथाकथीत मोजणी नकाशा चुकीचा व बेकायदेशीर आहे, सदर बेकायदेशीर मोजणी नकाशावर विश्वास ठेवून मा.तहसिलदारसाो. कडेगांव यांनी तथाकथीत बी.एन.डी./एस.आर/०२/२०२४ चे कामी दि.३०/०९/२०२५ रोजी दिलेला निर्णय बेकायदेशीर असून सदर निर्णय रद्दबातल असल्याचे ठरवून मिळणेसाठी वादींनी प्रस्तुत दावा दाखल केला असून 'प्रस्तुत दाव्याचे अंतिम निकालापर्यंत बी.एन.डी./एस.आर/०२/२०२४ चे कामी मे.तहसिलदारसाो. कडेगांव यांनी दि.३०/०९/२०२५ रोजी दिलेल्या निकालास स्थगिती देणेत यावी व बी.एन.डी./एस.आर/०२/२०२४ च्या निकालाच्या आधारे प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी दावा मिळकतीमधील वादींचे कब्जेवहिवाटीस हरकत अथवा अडथळा करु नये,' अशी प्रतिवादी क्र.१ ते २ यांना तुर्तातुर्त ताकीद देणेसाठी वादींनी विनंती केली आहे.

**१६.** याउलट, प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी मा.तहसिलदार कडेगांव यांचेकडे अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळणेकरीता बी.एन.डी.अर्ज नं.०२/२०२४ चा अर्ज दाखल केलेला होता, सदर अर्जाची दुतर्फा चौकशी होवून मोजणीदाराचा जबाब देखील झालेला होता, त्याप्रमाणे अतिक्रमण शाबीत झालेले आहे, त्यानुसार तहसिलदार यांनी बी.एन.डी.अर्ज नं.०२/२०२४ चे कामी अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा प्रतिवादी क्र.१ ते २

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.03.10 18:33:38 +0530

यांना देणेबाबत दि.३०/०९/२०२५ रोजी आदेश केलेला आहे, तो योग्य व बरोबर असून त्यानुसार प्रतिवादी क्र.१ ते २ यांना दावा मिळकत १ब व १ड या मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी केलेले अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा द्यावा लागू नये म्हणून वादी यांनी सदरचा खोटा व लबाडीचा दावा दाखल केलेला आहे, त्याचप्रमाणे वादींनी आजअखेर त्यांचे गटाची मोजणी करुन घेतलेली नाही, त्यामुळे तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज नामंजूर करावा, असे प्रतिवादी क्र.१ ते २ यांचे कथन आहे.

**१७.** अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता त्यामध्ये बी.एन.डी./एस.आर/०२/२०२४ चे कामी मे.तहसिलदारसाो. कडेगांव यांनी दि.३०/०९/२०२५ रोजी दिलेला आदेश (नि.क्र.३/१) दाखल असून सदर आदेशाचे अवलोकन केले असता सदर आदेश हा दावा मिळकत १ब गट क्र.८१९ ची मो.र.नं.४२१८/२०२४ मोजणी व दावा मिळकत १ड गट क्र.८३२ ची मो.र.नं.४१६२/२०२३ मोजणी यांच्या मोजणी नकाशाच्या आधारे व सदर मोजणी करणाऱ्या मोजणीदारांच्या जबाबाच्या आधारे देण्यात आलेला आहे असे दिसून येते. दावा मिळकत १ब गट क्र.८१९ ची मो.र.नं.४२१८/२०२४ मोजणी व दावा मिळकत १ड गट क्र.८३२ ची मो.र.नं.४१६२/२०२३ मोजणी यांचे मोजणी नकाशे (अनुक्रमे नि.क्र.१८/१ व नि.क्र.१८/२) येथे दाखल असून सदर मोजणीवेळी अनुक्रमे गट क्र.८१९ व गट क्र.८३२ यांची मोजणी झाली असल्याचे सदर नकाशांवरुन स्पष्ट होते. याकामी प्रतिवादी क्र.१ ते २ यांच्या जमीनीत वादींनी अतिक्रमण केले असल्याची तक्रार असून सदर अतिक्रमण काढून देणेबाबत बी.एन.डी./एस.आर/०२/२०२४ चे कामी मे.तहसिलदारसाो. कडेगांव यांनी दि.३०/०९/२०२५ रोजी आदेश (नि.क्र.३/१) दिलेला आहे. या कामी अतिक्रमणाची तक्रार असल्याने खरोखर अतिक्रमण झाले आहे किंवा कसे हे स्पष्ट होण्यासाठी अतिक्रमण दर्शवित असलेल्या हद्दीलगतच्या दोन्ही जमीनींची एकत्रीत मोजणी होणे आवश्यक आहे. परंतु, बी.एन.डी./एस.आर/०२/२०२४ चे कामी मे.तहसिलदारसाो. कडेगांव यांनी दि.३०/०९/२०२५ रोजी दिलेला आदेश (नि.क्र.३/१) यावरुन सदर आदेश देण्यापुर्वी दावा मिळकत १अ ते १ब व दावा मिळकत १क ते १ड यांची एकत्रीत मोजणी झालेली नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे, बी.एन.डी./एस.आर/०२/२०२४ चे कामी मे.तहसिलदारसाो. कडेगांव यांनी दि.३०/०९/२०२५ रोजी दिलेल्या आदेशाला वादींनी घेतलेल्या हरकतींमध्ये प्रथमदर्शनी तथ्य असल्याचे दिसून येते. सबब, प्रस्तुत दाव्याचे अंतिम निकालापर्यंत बी.एन.डी./एस.आर/०२/२०२४ चे कामी मे.तहसिलदारसाो. कडेगांव यांनी दि.३०/०९/२०२५ रोजी दिलेल्या निकालास स्थगिती देणे न्यायोचित ठरेल. तसेच, बी.एन.डी./एस.आर/०२/२०२४ चे कामी

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.03.10 18:33:43 +0530

मे.तहसिलदारसाो. कडेगांव यांनी दि.३०/०९/२०२५ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे ज्या क्षेत्रातील कब्जा काढून प्रतिवादी क्र.१ ते २ यांना द्यावयाचा आहे, ते क्षेत्र सध्या वादींच्या कब्जात असल्याचे अभिलेखावरुन स्पष्ट होते. त्यामुळे, प्रस्तुत दावा प्रथमदर्शनी वादींच्या बाजूने असल्याचे दिसून येते. अशा परिस्थीतीत वादींच्या विनंतीप्रमाणे तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश न दिल्यास कायदेशीर प्रकरणांची गुंतागुंत वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. वरील चर्चेनुसार प्रस्तुत दावा प्रथमदर्शनी वादींच्या बाजूने असल्याचा निष्कर्ष नोंदविलेला असल्याने प्रतिवादी क्र.१ ते २ यांचेविरूद्ध वादींच्या विनंतीप्रमाणे तुर्तातूर्त मनाई आदेश न दिल्यास वादींचे पैशाच्या स्वरूपात भरून न येणारे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत, न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने झुकत असल्याचे दिसून येते. त्यामुळे, 'प्रस्तुत दाव्याचे अंतिम निकालापर्यंत बी.एन.डी./एस.आर/०२/२०२४ चे कामी मे.तहसिलदारसाो. कडेगांव यांनी दि.३०/०९/२०२५ रोजी दिलेल्या निकालास स्थगिती आदेश' व 'प्रस्तुत दाव्याचे अंतिम निकालापर्यंत बी.एन.डी./एस.आर/०२/२०२४ च्या निकालाच्या आधारे प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी दावा मिळकतीमधील वादींचे कब्जेवहिवाटीस हरकत अथवा अडथळा करु नये' अशी तुर्तातुर्त ताकिद, प्रतिवादी क्र.१ ते २ यांचेविरूद्ध मिळण्यास वादी पात्र आहेत, असा निष्कर्ष निघतो. परिणामी, वादबिंदू क्र.१ ते ३ चे उत्तर मी 'होकारार्थी' देते आणि वादबिंदु क्र.४ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते-

**०१.** वादींचा नि.क्र.०५ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

**०२.** प्रस्तुत दाव्याचे अंतिम निकालापर्यंत बी.एन.डी./एस.आर/०२/२०२४ चे कामी मे.तहसिलदारसाो. कडेगांव यांनी दि.३०/०९/२०२५ रोजी दिलेल्या निकालास स्थगिती देणेत येते व प्रतिवादी क्र.१ ते २ यांना तुर्तातुर्त ताकिद देण्यात येते की, 'दाव्याच्या अंतिम निर्णयापर्यंत बी.एन.डी./एस.आर/०२/२०२४ च्या निकालाच्या आधारे प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी दावा मिळकत १अ व १क मधील वादींचे कब्जेवहिवाटीस हरकत अथवा अडथळा करु नये'.

**०३.** अर्जाचा खर्च दाव्यासोबत.

**स्थळ : कडेगांव**
**दिनांक : १०/०३/२०२६**

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.03.10 18:33:48 +0530

**(श्रीम.माधवी र.पाटकर)**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर,कडेगांव**